संक्षिप्त.फौ.खटला क्र. ४/२०२४
निशाणी क्र. ११

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. १**
**सरतपास शपथेवर सुरु.**

नाव : सोमनाथ संदिपान कुंभार ,
: वय – ४१ वर्षे, धंदा – पो. हवा. पिंपरी पो. स्टेशन
राहणार : नवी सांगवी, पुणे

**सरतपासणी सरकार पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती जे. आर. इंगळे यांचेमार्फत**

१. मी खडकी पोलिस स्टेशन येथे २०१८ पासन डिसेंबर २०२३ पर्यंत पो. हवा. म्हणुन कार्यरत होतो. दि. ३०.०५.२०२३ रोजी मला गोपनीय शाखेची ड्युटी होती. ती सकाळी ९ ते कर्तव्य संपेपर्यंत होती. त्यादिवशी नियंत्रण कक्षातुन मरियायी मार्शलला कॉल आला की संचेती हॉस्पीटलच्या शेजारी इंजिनिअरींग कॉलेजच्या उड्डानपुलाच्या कट्टयावर एक इसम चढुन आत्महत्येचा प्रयत्न करत आहे. तो कॉल साधारण १.४५ च्या सुमारास आला होता. त्यानंतर व. पो. अधिकारी ताम्हाणे, पो. नि. गुन्हे पाटील, मरियायी मार्शलचे घोलप, साबळे व मी सदर ठिकाणी पोहोचलो. तेव्हा आम्ही पाहिले की, एक इसम त्या उड्डान पुलाच्या कट्टयावर चढला होता व त्याच्या हातात बॅनर होता की, जुन्नर तहसीलदार यांच्यावर कार्यवाई करा. मी आंदोलन करत आहे. त्यानंतर आम्ही त्याच्याकडे विचारपुस केली असता त्याने त्याचे नाव महेंद्र संपत डावकर, रा. सुलतानपुर ता. जुन्नर असे सांगितले. त्याने पुढे सांगितले की, त्याचे वडिल जुन्नर तहसीलदार कार्यालयासमोर आंदोलन करत आहेत. त्यांच्या गावातील जागेच्या नोंदी तहसीलदार कार्यालयाने केल्या नाही म्हणुन आंदोलन करत असल्याचे सांगितले. त्यानंतर सदर इसमास वाचवण्यासाठी आम्ही अग्नीशामक दलास बोलावले. परंतु, त्याने गळ घातली की मला न्याय मिळाला नाहीतर मी येथुन उडी मारेल. त्यानंतर हवेली तालुक्याच्या तहसीलदार बारटक्के मॅडम सदर ठिकाणी आल्या त्यांनी व व. पोलीस अधिकारी ताम्हाणे यांनी त्याला समजावून त्याचे मतपरिवर्तन करून अग्नीशामक दलाच्या सहाय्याने त्याला खाली

उतरवले. त्यानंतर त्याला खडकी पोलिस स्टेशन येथे घेवुन आलो व तेथे आरोपीने आत्महत्येचा प्रयत्न करून त्यांचे म्हणणे मान्य करण्याकरिता तहसीलदारवर दबाव टाकला म्हणुन त्याच्याविरूध्द फिर्याद दिली. मला आजरोजी ती तक्रार दाखवण्यात आली. त्यावरील सही माझी आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. १२** देण्यात येते. मी आरोपीला पाहिल्यास ओळखू शकतो. तो आजरोजी न्यायालयात हजर आहे.

सरतपास पुर्ण.

**<u>उलटतपास आरोपींतर्फे श्रीमती. कचरे वकील यांचेमार्फत</u>**

२. हे खरे नाही की, मरियायी मार्शल कक्षाला काय कॉल आला होता याची मला स्पष्ट माहिती नाही. हे खरे आहे की, या केसचा संदर्भ जुन्नर तालुक्याशी आहे. हे खरे नाही की, आरोपी आत्महत्येच्या प्रयत्नात नव्हता केवळ त्यांच्या कुटुंबाला झालेल्या मानसिक त्रासामुळे व अन्यायामुळे तहसीलदारांचे व कलेक्टरचे लक्ष वेधुन घेण्याकरिता आरोपी त्या पुलाच्या कट्टयावर उभा होता. हे खरे आहे की, आरोपी उड्डानपुलावर थांबला नव्हता. हे खरे नाही की, अग्नीशामक दलाची मदत घेवुन आरोपीला खाली उतरवण्या एवढ्या अवघड जागी तो चढला नव्हता. हे खरे आहे की, अग्नीशामक दलाची गाडी आली त्यावेळेस मी हजर होतो. हे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पुर्ण.</u>**
**<u>फेरतपास काही नाही.</u>**

**श्रवणोत्तर स्विकृती**

PRAJKTA SHIRISH APTE Digitally signed by PRAJKTA SHIRISH APTE Date: 2026.03.07 17:50:33 +0530

(पी. एस. आपटे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र–२) खडकी, पुणे.

दिनांक – ०७/०३/२०२६